प्रेसनोट दिनांक ११/०१/२०२४.

**मुलाचे अपहरण करून, जबरी चोरीसह, खंडणी मागणाऱ्या ०४ आरोपींना गुन्हे शाखे कडून अटक.**

---

दिनांक २३/१२/२०२३ रोजी पहाटे ०६.०० वा. चे सुमारास, सोलापूर येथील सम्राट चौक येथे राहणारे, बाहेती व्यापारी याचा मुलगा- सर्वेश बाहेती हा, जिम साठी आवंती नगर येथे ॲक्सीस मोटार सायकल वरून जात असताना, ०४ अनोळखी इसमांनी, कारंबा नाका येथील ब्रिज जवळील गतीरोधकावर मोटार सायकल आडवी घालुन, त्याचे अपहरण केले. त्यानंतर, सर्वेश बाहेती याचे मोबाईल मधील फोन-पे चा वापर करून, त्याचेकडून रू.२०,०००/- काढुन घेवुन, सर्वेश बाहेती यांचे नातेवाईकास धमकी देवुन आणखीन पैशाची खंडणी स्वरूपात मागणी करून, सर्वेश बाहेती यास सोडून दिले होते. सदर घटनेबाबत फौजदार चावडी पोलीस ठाणेस गुरनं-७१४/२०२३ भादंवि-३४१, ३६४-अ, ३९२, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने, गुन्हा उघडकीस आणणे बाबत, मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी, गुन्हे शाखेकडील तपास पथकांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, गुन्हे शाखे कडील, स.पो.नि. संदीप पाटील व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी, घटनास्थळाचे तसेच अपहरण करून घेवुन गेलेल्या तसेच परत सोडलेल्या मार्गाची पाहणी करून, उपयुक्त तांत्रिक माहिती हस्तगत केली होती.

याबाबत, दि.०९/०१/२०२४ रोजी, सपोनि संदीप पाटील यांना, गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर बातमी मिळाली की, मेडीकल दुकानाना औषध पुरवणारे होलसेल डिलर बाहेती यांचे मुलाला, मोटार सायकलवरून किडनॅप करून, पैसे काढुन घेणारे इसम हे, एका काळया रंगाची नंबर प्लेट नसलेली वेस्पा मोटार सायकल व सिल्वर रंगाची एम.एच.१३ ए.सी.०७२४ स्प्लेंडर मोटार सायकल सह, जुना पुना नाका येथील नाल्याखालील रोडवर थांबले आहेत. त्यामुळे, सपोनि संदीप पाटील व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी, तेथे सापळा लावुन, जुना पुना नाका येथील नाल्याखालील रोडवर थांबलेल्या ०४ संशयीत इसमांना ताब्यात घेतले.

त्या ०४ संशयीत इसमांकडे केलेल्या चौकशीत त्यांची नावे- **१) प्रणव शाम ठाकूरदास, वय-२६ वर्षे, व्यवसाय- मेडीकल दुकानात नोकरी, रा. घर नं-३०७, बालाजी मंदिर जवळ, चौपाड, उत्तर कसबा, सोलापूर, २) रोहन शाम वनस्कर, वय-२१ वर्षे, व्यवसाय-प्लंबर, रा. घर नं-१८९, शास्त्री नगर, महादेव चौक, सोलापूर, ३) अजय अनिल कलागते, वय-२२ वर्षे, व्यवसाय-दुध विक्री, रा. घर नं-१७/४३, लतादेवी नगर, स्वागत नगर रोड, कुमठा नाका, सोलापूर, ४) रोहित अंकुश काटकर, वय-२४ वर्षे, व्यवसाय-इस्त्री दुकान, रा. घर नं-९, धोबी घाट, विकास नगर, होटगी रोड, सोलापूर** असे असल्याचे सांगितले. वर नमूद ०४ संशयीत इसमांकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर, सपोनि संदीप पाटील यांनी, वरील ०४ आरोपींची अंगझडती घेतली असता, त्याचेकडे, गुन्ह्यातील जबरीने चोरलेली १६,०००/- रूपये रोख रक्कम तसेच काळ्या रंगाच्या वेस्पा मोटार सायकलच्या डिकीत, गुन्हा करणेसाठी वापरलेली एक एअरगन (छर्रा बंदुक) मिळुन आले. तसेच, त्यांचेकडून सदर गुन्हा करणेकानी वापरलेल्या ०२ मोटार सायकली, ०४ मोबाईल **असा एकुण १,७८,५००/- किंमतीचा मुद्देमाल** जप्त केला असुन, सदर आरोपींना पुढील तपासकामी फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे हजर केले आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगीरी, मा.डॉ.श्री. राजेंद्र माने, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, व पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सुभाष मुंढे, वसीम शेख, गायकवाड, जेनुरे, सायबर कडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक- नेताजी गुंड, यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करीता.

Scanned with CamScanner

